आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र – सांय. ७.०० वाजता
२२ एप्रिल २०२१ – गुरुवार

**ठळक बातम्या**

आपल्या जीवनशैलीमुळे देशाचं कार्बन उत्सर्जन आंतरराष्ट्रीय सरासरीपेक्षा ६० टक्के कमी असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

कोरोना रुग्ण वाढीच्या पार्श्वभूमीवर राज्यात आज रात्रीपासून नवे निर्बंध लागू / आंतरजिल्हा वाहतूकीवरही बंदी

राज्यातली कृषी विद्यापीठं वगळता सर्व 13 विद्यापिठांच्या परिक्षा ऑनलाईन होणार, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांची माहिती

१८ वर्षावरील लाभार्थ्यांच्या लसीकरणासाठी या महिन्याच्या २८ तारखेपासून नोंदणीकरण होणार सुरु / कोविन जीओव्ही इन या संकेतस्थळावर करता येणार नोंदणी

**आणि**

राज्यात काल ६७ हजार ४६८ नव्या रुग्णांची नोंद / मुंबईतला रुग्ण दुपटीचा कालावधी ४८ दिवसांवर

**<><><><><>**

देशाचं कार्बन उत्सर्जन हे आंतरराष्ट्रीय सरासरीपेक्षा ६० टक्के कमी असून हे आमच्या जीवनशैलीमुळे शक्य होत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज

हवामान विषयक परिषदेला संबोधित करतांना सांगितलं. २०३० पर्यंत स्वच्छ इंधनासाठी प्रयत्न करण्यात येणार असून त्यासाठी सौर ऊर्जेवर लिड आयटी आणि प्रदूषण मुक्त पर्यावरण यावर भर देण्यात येणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. यासाठी भारत अमेरिका यांच्यात परस्पर सहकार्याने हरित इंधनासाठी एक सामाईक विषयपत्रिका तयार करण्यात येणार असल्याचंही ते म्हणाले. कोरोनानंतरच्या काळात पुन्हा प्राथमिकतेला महत्व देण्याची गरज असून भारतीयांच्या जीवनशैलीमुळे ते शक्य होईल असंही ते म्हणाले. स्वामी विवेकानंद यांच्या उदगारानुसार ध्येयप्राप्ती शिवाय आपण शांत बसणार नसल्याचं सांगत त्यांनी या कार्यात इतर देशांनाही सहकार्याचे आवाहन केलं.

<><><><><>

कोरोना रुग्ण वाढीच्या पार्श्वभूमीवर राज्यात आणखी निर्बंध लागू करण्यात आले आहेत. टाळेबंदी हा शेवटचा पर्याय असावा, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सर्व राज्यांना सल्ला दिला होता. त्यामुळे सरसकट टाळेबंदी लागू न करता निर्बंध कडक करण्य़ाचा मध्यम मार्ग काढत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काल हा निर्णय घेतला. आज रात्री 8 वाजल्यापासून या निर्बंधांची अंमलबजावणी सुरू होईल. त्यानुसार अत्यावश्यक सेवेतल्या आणि सरकारी ओळखपत्र असलेल्या कर्मचाऱ्यांनाच केवळ उपनगरी रेल्वेतून प्रवासाला मुभा असेल. मेट्रो, मोनो साठी हेच नियम लागू असतील. सार्वजनिक आणि खाजगी बस मधून एकूण क्षमतेच्या केवळ 50 टक्के प्रवाशांना प्रवासाची मुभा असेल. टक्सी, रिक्शांनाही हाच नियम लागू असेल. विवाह समारंभांना केवळ 25 जणांनाच परवानगी असेल. राज्य आणि केंद्र सरकारी कार्यालयात केवळ 15 टक्के उपस्थितीची परवानगी असेल कार्यालयात जास्त कर्मचाऱ्यांची आवश्यकता असेल, तर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची परवानगी आवश्यक असेल. खाजगी कार्यालयांनाही कर्मचारी उपस्थितीसाठी हेच नियम लागू असतील. आंतरजिल्हा

वाहतुकीवर बंदी घालण्यात आली आहे. केवळ परवानगीनेच हा प्रवास करता येईल. अन्य जिल्ह्यात प्रवास केल्यावर 14 दिवसांची विलगीकरणाची सक्ती करण्यात आली आहे. अत्यावश्यक वस्तू, मटण-अंडी, भाजीपाला आदी दुकानांना केवळ सकाळी सात ते अकरा पर्यंत सुरू ठेवायला मुभा दिली आहे.

<><><><><>

राज्यातली कृषी विद्यापीठं वगळता सर्व 13 विद्यापिठांच्या परिक्षा ऑनलाईन होणार असल्याची माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी आज दिली. परिक्षांबाबत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक झाली, त्यावेळी हा निर्णय घेतला असल्याचं सामंत यांनी सांगितलं. एकही विद्यार्थी परिक्षेपासून वंचित राहू नये, म्हणून हा निर्णय घेतला आहे, असं ते म्हणाले. सर्व विद्यापिठांच्या कुलगुरूं बरोबर चर्चा केल्यानंतर 2021-2022 शैक्षणिक वर्ष कधी सुरू करायचं, ते ठरवलं जाईल. 1 मे पासून 18 वर्षांवरील सगळ्यांचं लसीकरण केलं जाणार आहे. लसीकरण केद्रांवर गर्दी होऊ नये, म्हणून 18 ते 25 वयोगटातल्या विद्यार्थांचं लसीकरण करण्यासाठी वेगळी यंत्रणा राबवण्या संबंधी या बैठकीत चर्चा झाली, असंही त्यांनी सांगितलं. कोरोनाचा प्रकोप कमी झाल्यानंतर प्राध्यापकांच्या नियुक्तींबाबतचा निर्णय, तसंच कृषी विद्यापिठांच्या परिक्षांबाबतचा निर्णय लवकरच घेतला जाईल, असंही ते म्हणाले.

<><><><><>

देशातल्या १८ वर्षांवरील सर्व नागरिकांच्या लसीकरणासाठीची नोंदणी येत्या २८ एप्रिलपासून सुरु होणार आहे. त्यासाठी पात्र असणाऱ्यांनी कोविन जीओव्ही इन या संकेतस्थळावर नोंदणी करता येणार आहे. नोंदणी केलेल्यांना लसीकरणाच्या तिसऱ्या टप्प्यात येत्या १ मे पासून लस दिली जाणार आहे. अशी माहिती केंद्रिय आरोग्य मंत्रालयानं दिली आहे. सर्व सरकारी लसीकरण केंद्रावर ही लस विनालूल्य

दिली जाणार असून त्या बरोबरच आरोग्य कर्मचारी आणि पंचेचाळीस वर्षावरील नागरिकांचेही लसीकरण सुरुच राहाणार आहे. लस उत्पादन कंपन्यांना आपल्या उत्पादित लसींपैकी पन्नास टक्के लसींच्या मात्रा या राज्य सरकारांना तसंच खुल्या बाजारात थेट विकण्याची मुभाही देण्यात आल्याचंही  मंत्रालयानं स्पष्ट केलं.

<><><><><>

राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीच्या परिक्षा रद्द केल्या नंतर दहावीच्या सर्वच विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करण्याचा निर्णय राज्य शिक्षण विभागानं घेतला आहे. शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी काल हा निर्णय जाहीर केला. काल या संदर्भात अधिकारी आणि तज्ञांची या संदर्भात बैठक झाली, त्यात हा निर्णय घेतल्याचं त्यांनी सांगितलं. कोरोनामुळे विद्यार्थ्यांचं नुकसान होऊ नये, म्हणून हा निर्णय घेतल्याचं त्यांनी सांगितलं. हे सर्व विद्यार्थी अकरावी किंवा अनुषंगिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पात्र ठरतील. दहावीची परिक्षा देणारे, फेरपरिक्षार्थी यांचं मुल्यमापन कसं करावं याबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत. अशा विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन नंतर ठराविक कालावधीत श्रेणी सुधाराण्यासाठी, त्यांना पुन्हा परिक्षा देण्याचा पर्याय असेल, असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

देशातल्या सर्व राज्यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार वैद्यकीय ऑक्सीजनचा पुरवठा कोणत्याही अडथळ्याविना व्हावा याकडे लक्ष देण्याचे निर्देश प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले आहेत. देशभरात वैद्यकीय ऑक्सीजनची उपलब्धता आणि पुरवठा याचा आढावा घेण्यासाठी तसंच उपलब्धता वाढवण्याच्या दृष्टीनं उपायांवर चर्चा करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आज प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते. ऑक्सीजनच्या वाहतुकीत अडथळे येत असल्यास स्थानिक प्रशासनाला विश्वासात घ्यावं तसंच

ऑक्सीजनचं उत्पादन वाढवण्यासाठी आणि पुरवठा वेगवान करण्यासाठी नाविन्यपूर्ण उपायांचा विचार करावा असं मोदी यांनी सांगितलं. ऑक्सीजनच्या साठेबाजीवर कठोर कारवाई करण्याचं आवाहन त्यांनी राज्यसरकारांना केलं.

ऑक्सीजनची मागणी राज्यसरकारांकडून जाणून घेऊन पुरवठ्याचं नियोजन करत असल्याची माहिती यावेळी अधिकाऱ्यांनी दिली. 20 राज्यांमधे मिळून दररोज 6 हजार 785 मेट्रीक टन एवढी मागणी नोंदली असून केंद्राने दररोज 6 हजार 822 मेट्रीक टन पुरवठा मंजूर केला आहे.

गेल्या काही दिवसांत द्रवरुप ऑक्सीजनच्या उपलब्धतेत दररोज 3 हजार 300 टनांची भर पडली आहे. पोलाद प्रकल्प, ऑक्सीजन उत्पादक, इतर उद्योग यांनी योगदान दिल्यामुळे तसंच इतर कामांसाठी ऑक्सीजन पुरवठ्याला बंदी घातल्याने हे शक्य झालं आहे. ऑक्सीजनच्या वाहतुकीसाठी टँकर्स मधे बदल करणं, नवीन टँकर्स आयात करणं इत्यादी उपाययोजना करण्यात येत आहेत. रेल्वेनेही ऑक्सीजन टँकर्सची वाहतूक करण्यात येत असून त्यातली पहिली ऑक्सीजन एक्सप्रेस गाडी मुंबईहून निघून विशाखापट्टणमला पोचली आहे.

या एका गाडीत 105 मेट्रीक टन द्रवरुप ऑक्सीजन असेल. प्रवासाचा वेळ वाचवण्याच्या दृष्टीने रिकामे टँकर्स विमानानेही पाठवले जातील असं या बैठकीत सांगण्यात आलं.

वैद्यकीय क्षेत्रातले तज्ञही बैठकीत सहभागी झाले होते. ऑक्सीजनचा वापर काळजीपूर्वक आणि काटेकोरपणे करणं आवश्यक असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं.

कॅबिनेट सचिव, प्रधानमंत्र्यांचे प्रधान सचिव, गृह, आरोग्य, वाणिज्य-उद्योग, रस्ते वाहतूक, औषध निर्माण, या विभागांचे सचिव तसंच नीती आयोगाचे प्रतिनिधी बैठकीला उपस्थित होते.

<><><><><>

राज्यात काल ५४ हजार ९८५ रुग्णांनी कोरोनावर मात केली. राज्यात आतापर्यंत ३२ लाख ६८ हजार ४४९ रुग्ण, कोरोनामुक्त झाले असून, राज्याचा कोविडमुक्तीचा दर ८१ पूर्णांक १५ शतांश टक्के झाला आहे. काल ६७ हजार ४६८ रुग्णांची नोंद झाली, त्यामुळे राज्यातल्या कोविड बाधितांची एकूण संख्या ४० लाख २७ हजार ८२७ झाली आहे. सध्या राज्यात ६ लाख ९५ हजार ७४७ रुग्णांवर उपचार सुरू आहेत. काल ५६८ रुग्णांचा मृत्यू झाला, राज्यात या संसर्गानं दगावलेल्या रुग्णांची एकूण संख्या, ६१ हजार ९११ झाली असून, मृत्यूदर १ पूर्णांक ५४ शतांश टक्के झाला आहे.

<><><><><>

मुंबईत काल 6 हजार 790 रुग्ण बरे झाल्यानं त्यांना घरी पाठवण्यात आलं. आतापर्यंत 5 लाख 3 हजार 53 रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत. काल 7 हजार 684 नवीन रुग्णांची नोंद झाली. मुंबईत आतापर्यंत रुग्णांची संख्या 6 लाख 1 हजार 590 झाली आहे. मुंबईतला रुग्ण दुपटीचा कालावधी 48 दिवसांवर आलाय. सध्या 84 हजार 743 रुग्ण उपचार घेत आहेत. काल 62 रुग्णांचा मृत्यू झाला असून, एकूण मृतांचा आकडा 12 हजार 501 वर पोचला आहे.

<><><><><>

**भंडारा** जिल्ह्यात आज 1 हजार 568 रुग्ण बरे होऊन घरी गेले. जिल्ह्यात बरे झालेल्या रुग्णांची संख्या 29 हजार 365 झाली आहे. आज 947 नवे कोरोनाबाधित रुग्ण आढळले आहेत. जिल्ह्यातली पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या 41 हजार 461 झाली आहे. रुग्ण बरे होण्याचे प्रमाण 70.82 टक्के आहे

**वर्धा** जिल्ह्यात आतापर्यंत 22 हजार 617 रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. जिल्ह्यातला बाधितांचा आकडा 27 हजार 665 रुग्णांना या आजाराची लागण झाली आहे. सध्या 4 हजार 473 रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

**सिंधुदुर्गात** आज ११० जणांना डिस्चार्ज देण्यात आला, त्यामुळे आतापर्यंत कोरोनावर मात केलेल्यांची एकूण संख्या ७ हजार ६१९ झाली आहे. आज २३७ रुग्णांचे अहवाल पॉझिटिव्ह आले. त्यामुळे कोरोनाबाधित रुग्णांची एकूण संख्या आता १० हजार ७६३ झाली आहे. जिल्ह्यात सक्रिय रुग्णांची संख्या २ हजार ८८९ वर पोचली आहे. कोव्हीड-१९ मुळे आज तब्बल१५ जणांचा मृत्यू झाला.

**गडचिरोली** जिल्ह्यात आज 354 रुग्ण या आजारातून बरे झाले. आज 417 रुग्णांचा अहवाल पॉझिटिव्ह आला. सध्या जिल्ह्यात 3883 रुग्ण उपचार घेत आहेत. जिल्ह्यात या आजारामुळे आज 19 रुग्ण दगावले.

<><><><><>

परभणी जिल्ह्यातील कोरोनाबाधित रुग्णांच्या संख्येत होणारी वाढ लक्षात घेता, परभणीत 500 खाटांचं तर आठ तालुक्यांच्या ठिकाणी 50 खाटांच्या क्षमतांची कोवीड सेंटर उभारली जाणार आहेत. तसचं ऑक्सीजनचा पुरवठा सुरळीत व्हावा यादृष्टीने जिल्हा प्रशासनाने उपाययोजना केल्याची माहिती पालकमंत्री नवाब मलिक यांनी आज दिली. ते जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. कोविड केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांबरोबरच अन्य सुविधाही उपलब्ध केल्या जातील, असं ते म्हणाले. कोरोना विरूध्दच्या या लढाईत प्रतिबंधात्मक उपाययोजनांकरिता भरीव अशी तरतूद करण्यात आली असून व्हेटिंलेटर खरेदीचे सर्वधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिल्याचही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

नागरी जीवनातल्या पर्यावरण रक्षणासाठी पुण्याच्या दक्षिण कमांड या भुदलाच्या शाखेनं विस्फोटक मुक्त बंदरगाह ही मोहिम सुरु केली आहे. यामध्ये वेगवगळ्या ठिकाणाहून गोळा करण्यात आलेली स्फोटकं नष्ट करण्यात येणार आहेत. गेल्या काही वर्षांपासून मुंबई, गुजरात, कानपूर, जयपूर आणि जोधपूरच्या काही कारखान्यांमधून

आणि भंगार गोदामांमधून शोधून काढलेली १६०० मेट्रिक टन स्फोटकं नष्ट करण्यात येणार आहेत. यासाठी भारतीय भुदलानं संरक्षण मंत्रालयाच्या सूचनांनुसार ही मोहिम राबवली असून यासाठी पुलगाव इथल्या विशेष बॉम्ब विरोधी दलातल्या अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांच्या देखरेखीखाली या स्फोटक वस्तू नष्ट करण्यात येणार आहेत.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय गुंतवणूक बाजारात निर्माण झालेल्या सकारात्मक वातावरणाचा परिणाम आज मुंबई शेअर बाजाराच्या सूचकांकावर होऊन मुंबई शेअर बाजार 48 हजार 81 अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय बाजाराचा निफ्टीही 14 हजार 406 वर बंद झाला.

<><><><><>

अहमदनगर जिल्ह्याच्या श्रीरामपूर इथले लोकसत्ताचे जेष्ठ पत्रकार अशोक तुपे यांचं कोरोनामुळे दुःखद निधन झालं.

नगर इथल्या खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. अशोक तुपे यांना कृषी विषयक लेखनाची आवड होती. महाराष्ट्र शासनाच्या वसंतराव नाईक कृषी पत्रकार पुरस्कार देऊन त्यांना गौरवण्यात आलं होतं. तसंच अनेक सामाजिक संस्थाकडून गौरवण्यात आलं होतं. नगर उत्तर जिल्ह्याच्या राजकारणाची त्यांना चांगली जाण होती.

<><><><><>

इस्लाम धर्माचे अभ्यासक पद्मविभूषण मौलाना वाहीद्दुद्दीन खान यांचं आज नवी दिल्लीतल्या एका खाजगी रुग्णालयात निधन झालं. ते ९६ वर्षांचे होते. वाहीद्दुद्दीन खान यांच्या निधनाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

गेल्या चोविस तासात विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला, तर कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात हवामान कोरडं होतं.

तसंच येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//